## भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र
(दुपार)

जा.क्र. ६७१/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक २७/०९/२०१७

**१) जळाल्याने उपचारा दरम्यान महिलेचा मुत्यु :–**

दिनांक २५/०९/२०१७ चे ११ .१० वाजता दरम्यान यातील मृतक श्रीमंती ममता लिलाधरे उईके वय ३३ वर्ष, रा. देवुळगाव हि दिनांक २५/०९/१७ ला रात्री ०१.३३ वाजता जळाल्याने सा.रू.भंडारा औषधोपचारा करीता वार्ड क्रमांक १९ मध्ये भरती केले असता, ती ९५ टक्के जळाल्याने उपचारा दरम्यान दिनांक २५/०९/१७ चे ११.१० वाजता मरण पावल्याने पो. स्टे. भंडारा येथे मर्ग ००/१७ कलम १७४ जाफौ. चे कागदपत्र जा.क्र. ५४९४/१७ दिनांक २५/०९/१७ अन्वये प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी सफौ.सोलंकी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन आंधळगाव येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोउपनि म्हैसकर पो.स्टे आंधळगाव हे करीत आहेत.

**२) कुलरचा विदयुत करंट लागुन ईसमाचा मुत्यु :–**

दिनांक २६/०९/२०१७ चे १९ .३५ वाजता दरम्यान यातील मृतक देवदास लहु ढबाले वय ३२ वर्ष, रा. वाहिनी हा त्याचे घरी कुलर चे काम करीत असतांना, अचानक कुलरचा विदयुत करंन्ट लागल्याने त्यास ग्रामिण रूग्णालय सिहोरा येथे नेले असता, डॉक्टरने तपासुन मृत घोषित केल्याने डॉक्टरी मेमो वरून सरतर्फे फिर्यादी पोशि.पठाण यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन सिहोरा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सफौ उईके पो.स्टे सिहोरा हे करीत आहेत.

**३) पाण्यात बुडुन इसमाचा मृत्यु :–**

दिनांक २५/०९/२०१७ चे १७.४५ ते दिनांक २६/०९/१७ चे १७.०० वाजता दरम्यान यातील मृतक कैलास हिरामन भट वय ३८ वर्ष रा. आलेसुर हा त्याचा पुतण्या अमित सदाशिव भट वय १३ वर्ष रा.आलेसुर हयाचेसह त्यांच्या बहीणीकडे धोबी टोला म.प्र.येथे मोटार सायकल क्रमांक एम एच ४० एस २३१७ नी डबल सिट गेले होते. ते दिनांक २५/०९/१७ चे १७.४५ वाजता दरम्याने गोरेघाट येथुन निघुन गावाकडे परत येत असता, मृतक हा मोटार सायकल सह बावनथडी नदीचे नहराचे पाण्यात बुडुन मरण पावल्याची फिर्यादी नामे प्रकाश हिरामण भट वय ४० वर्ष रा.आलेसुर हयांनी तोंडी तक्रार दिल्याने पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास सपोनि झोंटिग पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**४) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–**

दिनांक २६/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण १२१ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून त्यापैकी अवैध प्रवासी ०२, तीन सिटर वाहनांवरती १० केसेस व तसेच ईतर वाहनांवरती १०९ केसेस करण्यात आले आहे.

(एस. व्ही. कुलकर्णी )
पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा
दुरध्वनी.क्र. ९९८७३८५४०५

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

**प्रत, संगणक कक्ष,** भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता